## आमचे आधारस्तंभ

**मा. राजगोंडा पाटील (तात्या)**
चेअरमन, यशवंत शिक्षण संस्था, सांगली (कुपवाड).

**मा. महावीर चौगुले**
व्हाईस चेअरमन, यशवंत शिक्षण संस्था, सांगली (कुपवाड).

**मा. श्रीमती विनयश्री पाटील**
संचालक, यशवंत शिक्षण संस्था, सांगली (कुपवाड).

**मा. डॉ. जयपाल शेट्टी**
अध्यक्ष, विश्वस्त समिती, यशवंत शिक्षण संस्था, सांगली (कुपवाड).

**मा. राजाराम सगरे**
अध्यक्ष, शासक समिती, यशवंत शिक्षण संस्था, सांगली (कुपवाड).

**मा. आदगोंडा पाटील (गुरुजी)**
सचिव, यशवंत शिक्षण संस्था, सांगली (कुपवाड).


**मा. प्रा. तुकाराम मेटकरी**
सहसचिव, यशवंत शिक्षण संस्था, सांगली (कुपवाड).

## शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद, कोल्हापूर

### कार्यकारी मंडळ

| | | |
|---|---|---|
| १. डॉ. अवनीश रामकृष्ण पाटील | – | अध्यक्ष |
| २. प्रा. सतिश यशवंत चौगुले | – | उपाध्यक्ष |
| ३. डॉ. धीरज सुरेश शिंदे | – | सचिव |
| ४. डॉ. दत्तात्रय रमेश मचाले | – | सहसचिव |
| ५. डॉ. संतोष अभिमन्यू जेठीथोर | – | खजिनदार |
| ६. डॉ. चंद्रवदन मोहनराव नाईक | – | सदस्य |
| ७. डॉ. संदिप भैरू जाधव | – | सदस्य |
| ८. डॉ. सुवर्णा प्रकाश पाटील | – | सदस्य |
| ९. डॉ. तानाजी रामचंद्र हवालदार | – | सदस्य |
| १०. डॉ. भिमाशंकर मडोळप्पा बिराजदार | – | सदस्य |
| ११. डॉ. निलांबरी भारत जगताप | – | सदस्य |
| १२. प्रा. आप्पासाहेब नामदेव केंगार | – | सदस्य |
| १३. डॉ. सुरेश मारूती चव्हाण | – | स्विकृत सदस्य |
| १४. डॉ. उर्मिला नरसिंगराव क्षीरसागर | – | स्विकृत सदस्य |
| १५. डॉ. श्रीधर भाऊसाहेब शिंदे | – | स्विकृत सदस्य |





### संयोजन समिती

**प्रा. अविनाश भोरे**
मराठी विभाग प्रमुख

**प्रा. डॉ.शाहीन जमादार**
हिंदी विभाग प्रमुख

**प्रा. डॉ.प्रकाश पाटील**
इंग्रजी विभाग प्रमुख

**प्रा. श्रीमती शुभांगी पाटील**
उपप्राचार्य, विज्ञान विभाग

**डॉ. श्रीधर शिंदे**
सहसमन्वयक
इतिहास विभाग
९८२२७६५७६५

**डॉ. सुवर्णा पाटील**
समन्वयक
उपप्राचार्य, इतिहास विभाग प्रमुख
९८२२०२०२२५

बुक-पोस्ट

प्रति, ______________________

______________________

______________________

*प्रेषक*
**मा.डॉ. आनंदराव जाधव**
प्राचार्य,
मिरज महाविद्यालय, मिरज.

प्रेरणास्थान



मा. प्रा. शरद पाटील (सर)

# शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषदेचे

# २६ वे

# वार्षिक अधिवेशन

सोमवार, दि. १२ फेब्रुवारी २०२४

### आयोजक

## यशवंत शिक्षण संस्थेचे
## मिरज महाविद्यालय, मिरज.



### संयोजक

**मा. प्राचार्य डॉ. आनंदराव जाधव**
बुधगावकर मळा, शासकीय दूध डेअरी जवळ, मिरज.
ता. मिरज. जि. सांगली. महाराष्ट्र ४१६ ४१०
फोन/फॅक्स नं. ०२३३-२२११९१९/७०२०२३६२४१
Website - miraj_mahavidyalaya.org
Email - mirajmahavidyalayamiraj@gmail.com

सोमवार, दि. १२ फेब्रुवारी २०२४

## कार्यक्रम पत्रिका

सकाळी ९.०० ते १०.००

नाव नोंदणी व अल्पोपहार

### उद्घाटन समारंभ

सकाळी १०.०० वा.

### अध्यक्ष

**मा.डॉ. राधिका शेषन**
माजी इतिहास विभाग प्रमुख,
सावित्रीबाई फुले विद्यापीठ,पुणे

### प्रमुख पाहुणे व उद्घाटक

**मा. राजगोंडा पाटील (तात्या)**
चेअरमन, यशवंत शिक्षण संस्था, सांगली (कुपवाड).

### स्वागताध्यक्ष

**मा. प्राचार्य डॉ. आनंदराव जाधव**

### प्रमुख उपस्थिती

मा.प्रा.डॉ.अवनीश पाटील — मा.ॲड.वैशाली देवर्षी
मा.सरोज रायनाडे — मा.डॉ.सुप्रिया आडमुठे

### प्रा.अ.रा.कुलकर्णी स्मृती व्याख्यानमाला

सकाळी ११.०० वा

| | |
|---|---|
| * शोध निबंध वाचन | दु. १२.३० ते १.३० वा. |
| * भोजन | दु. १.३० ते २.०० वा. |
| * शोध निबंध वाचन | दु. २.०० ते ४.०० वा. |

### समारोप समारंभ

सायं. ४.००

### प्रमुख पाहुणे

**मा. प्रा. (डॉ) अरुण भोसले**
माजी इतिहास विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**अध्यक्ष - मा. प्राचार्य डॉ. आनंदराव जाधव**

* सर्वसाधारण सभा — सा. ४.३० वा.

प्रिय इतिहास प्रेमी,
सप्रेम नमस्कार...
आपणास कळविण्यास आनंद होत आहे की, मिरज महाविद्यालय,मिरज इतिहास विभागामार्फत शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषदेचे २६ वे वार्षिक अधिवेशन सोमवार, दि. १२ फेब्रुवारी २०२४ रोजी मिरज महाविद्यालय, मिरज मध्ये आयोजित करण्यात येत आहे. आपणास विनंती आहे की, आपल्या महाविद्यालयातील इतिहास विषयाचे प्राध्यापक, संशोधक, इतिहास अभ्यासक, विद्यार्थी यांना सदर परिषदेसाठी पाठवून द्यावे. अधिवेशन यशस्वी करण्यास सहकार्य करावे.

**मिरज : ऐतिहासिक महत्व**

मिरज हे सांगली जिल्ह्यातील प्राचीन काळापासून ऐतिहासिक महत्व असलेले तालुक्याचे ठिकाण आहे. प्राचीन, मध्ययुगीन काळात मिरज शहराला ऐतिहासिक महत्व होते . आधुनिक काळात मिरज शहराला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. शहर कृष्णा नदीच्या काठावरती निसर्गरम्य परीसरामध्ये वसलेले, पौराणिक आणि ऐतिहासिक वारसा असलेले संपन्न व समृध्द शहर आहे. रामायणामध्ये उल्लेख असलेल्या मरिचीप ऋषींचा आश्रम या परिसरात होता. यावरून 'मरिची' 'मिरिंजी' नंतर 'मिरज असे नाव प्राप्त झाले असे आख्यायिकांतून दिसते. प्राचीन काळातील सातवाहनांपासून ते यादवांपर्यंत आणि मध्ययुगातील खिलजीपासून ते आदिलशाहीपर्यंत 'मिरिंजी','मुबारकाबाद','मिर्ज','मुर्तजाबाद' अशा विविध नामाभिधानाने विविध प्रशासकीय स्तरावर कार्यरत असलेले हे शहर आहे. छत्रपती शिवाजी महाराजांपासून ते राजर्षी शाहु महाराजापर्यंत मराठ्यांच्या इतिहासामध्ये सुध्दा या शहराचे स्थान अनन्यसाधरण आहे. आधुनिक मिरज म्हणजे दक्षिण महाराष्ट्राचे प्रवेशद्वारच ! अशा ऐतिहासिक मिरज शहरामध्ये आपले स्वागत आहे.

**मिरज महाविद्यालय :**

दे. भ. आर. पी. पाटील (आण्णा) यांनी स्वातंत्र्य आंदोलनाच्या लढयात सक्रिय सहभाग घेतला आणि स्वातंत्र्यानंतर बहुजन समाजाला स्वातंत्र्याची फळे चाखता आली पाहीजेत यासाठी शिक्षणाची गरज आहे. म्हणुन 'ज्ञानम् परम् दैवतम्' हे ब्रीद घेऊन यशवंत शिक्षण संस्थेची स्थापना केली. मिरज आणि मिरज परिसरातील गरीब, होतकरू, दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांची गरज ओळखून माजी आ. प्रा. शरद पाटील यांनी १९९३ साली मिरज महाविद्यालय, मिरज ची स्थापना केली. हे सांगली जिल्ह्यातील एक नामवंत महाविद्यालय आहे. संस्थेचे चेअरमन कै. प्रा. शरद पाटील (सर) यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाने यशस्वी वाटचाल केली आहे. सध्या विद्यमान चेअरमन मा. राजगोंडा पाटील (तात्या) यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाची वाटचाल सुरू आहे.

**अधिवेशनासंबंधी :**

इतिहास परिषदेचे २६ वे वार्षिक अधिवेशन आणि त्या अनुषंगाने आजच्या गतीमान युगात इतिहास विषयाकडे पाहण्याची नवी दृष्टी विकसीत करणे, प्राध्यापक, संशोधकांचे विविध शोधनिबंध वाचन, चर्चा यामधून ज्ञानाची नवी दालने खुली करणे हा मुख्य उद्देश आहे. त्या अनुषंगाने विषयांची व्याप्ती, परिणाम, वेगळेपणा आणि घटनेसंबंधी संदर्भसाधने याविषयी विस्तृत चर्चा होऊन पुढील संशोधनास वाव मिळावा, नव्याने प्रकाश टाकला जावा आणि तो नवा इतिहास समाजापुढे यावा या उद्देशाने हे अधिवेशन आयोजित केले आहे. याशिवाय छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक समारंभास दि. ६ जुन २०२४ रोजी ३५१ वर्षे पूर्ण होत आहेत. तसेच राजश्री शाहू महाराज यांचे १५० वे जयंती वर्ष आहे. या दोन्ही ऐतिहासिक घटनांचे महत्व समाजापुढे व संशोधकांपुढे अधोरेखित करणे देखील अपेक्षित आहे यासाठी खाली दिलेल्या विषयाच्या अनुषंगाने येणारे आपले शोधनिबंध अधिवेशनात सादर करावेत.

**शोधनिबंध लेखकांना सूचना :**

१) शोधनिबंधासाठी पहिल्या स्वतंत्र पानावर शोधनिबंधाचे नाव, संपूर्ण नाव, पत्ता, महाविद्यालयाचे नाव, संपर्क क्रमांक, ईमेल आयडी, विशेष अभ्यास क्षेत्र याचा स्पष्ट उल्लेख करावा. तसेच आजीव सभासद क्रमांक नोंद करावा.
२) शोधनिबंध मराठी/हिंदी/इंग्रजी भाषेतून असावेत.
३) निबंध युनिकोड टंकलेखन व संगणकाद्वारे मुद्रीत केलेला असावा. शोधनिबंधाची शब्द मर्यादा ३००० ते ३५०० शब्द इतकी असावी. आरंभी शोधनिबंधाचा गोषवारा द्यावा.
४) शोधनिंबध ए ४ आकाराच्या कागदावर एका बाजूस मुद्रीत केलेला असावा.
५) शोधनिबंधाच्या मराठी/हिंदी भाषेसाठी युनिकोडमध्ये टायपिंगसाठी १६ फॉंट साईज वापरावा आणि इंग्रजी भाषेसाठी **Times New Roman** मध्ये १२ फॉंट साईज वापरावा.
६) संदर्भ तसेच टिप लिहिताना लेखकाचे नाव, संदर्भ ग्रंथाचे नाव, खंड क्र. (असल्यास), प्रकाशक, प्रकाशन वर्ष, पृष्ठ क्रमांक या प्रमाणे देणे आवश्यक आहे.
७) नियतकालिकामधील शोधनिबंधाच्या संदर्भ टिपा पुढीलप्रमाणे देणे आवश्यक आहे. लेखकाचे नाव, शोधनिबंधाचे नाव, नियतकालिकाचे नाव, अंक क्रमांक, प्रकाशनाची तारीख, पृष्ठ क्रमांक, उदा. रवींद्र कुमार, जवाहरलाल नेहरू, दि इंडियन नॅशनल कॉंग्रेस अँड ॲन्टिफॅसिस्ट स्ट्रगल, इंडियन हिस्टोरिकल रिव्ह्यु ०९,१-२, १९८४-८५, पृ.९७-११०
८) संदर्भाची पुनरावृत्ती होत असेल तर कित्ता (Ibid), उपरोक्त (Op.Cit), तैत्रव (Loc.Cit), असा उल्लेख करून त्यापुढे खंड/अंक/पृष्ठ क्रमांक द्यावा.
९) इतिहास परिषदेचे सभासद असलेल्या प्रतिनिधींसाठी सभासद शुल्क रू. ७००/- भरावे लागतील. आणि आजीव सभासद नसलेल्या प्रतिनिधींसाठी रू.८००/- भरावे लागतील.
१०) संशोधक विद्यार्थी प्रतिनिधींसाठी शुल्क रू.३००/- राहील. एम.ए.,बी.ए. च्या विद्यार्थ्यांसाठी रू. २००/- भरावे लागतील.
११) परिषदेचे आजीव सभासद शुल्क रू. २०००/- असून नवीन आजीव सभासद होण्यासाठी अधिवेशनापूर्वी शुल्क जमा करण्याची व्यवस्था अधिवेशनाच्या ठिकाणी करण्यात आली आहे. अधिवेशनाचे शुल्क खालील QR Code स्कॅन करून जमा करावे.

खालील विषयातील शोधनिबंध दि. ०७ फेब्रुवारी २०२४ अखेरपर्यंत इतिहास परिषदेच्या shivajiuhck95@gmail.com या ईमेल आयडीवर पाठवावेत. त्यानंतर आलेल्या शोधनिबंधाचा विचार केला जाणार नाही.

रजिस्ट्रेशन लिंक : https://forms.gle/qTpxb7UmiwnEWxqX8

### विशेष विषय

अ) छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाची ३५० वर्षे
ब) छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची १५० वी जयंती
क) भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव या व्यतिरिक्त खालील पारंपारिक विभागातंर्गत शोधनिबंध तयार करावेत.
१) प्राचीन विभाग
२) मध्ययुगीन विभाग
३) आधुनिक विभाग
४) समकालीन इतिहास
५) स्थानिक इतिहास

SCAN AND PAY WITH ANY UPI APP